# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

-----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक ०४ जुलै, २०२५ / आषाढ १३, १९४७ (शके)

(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री
(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्ये मंत्री
(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री
(४) शालेय शिक्षण मंत्री
(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री
(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री
(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री
(८) वस्त्रोद्योग मंत्री
(९) सहकार मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

-----------------------------------------

प्रश्नांची एकूण संख्या - ४३

-----------------------------------------

**राज्यातील शाळांच्या संच मान्यतेमध्ये दुरुस्ती करून शालार्थ आयडी वेळेत मिळणेबाबत**

**(१) * २७१२ श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.किरण सरनाईक, श्री.जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.शशिकांत शिंदे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संच मान्यतेनुसार जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षक मुख्याध्यापकांची पदे निश्चित होतात त्यानुसार सन २०२४-२५ या वर्षाच्या संच मान्यतेचे निकष शिक्षण विभागाने जाहीर केले असून त्यानुसार जिल्हा परिषद शाळांचा फायदा होण्याऐवजी तोटा सहन करावा लागणार आहे, दिनांक १५ मार्च,२०२४ रोजी संच मान्यता निकषासंदर्भात शासन निर्णय निर्गमित झाला असून पुणे विभागातील माध्यमिक शाळेतील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप शालार्थ आयडी मिळालेले नाहीत व संच मान्यता दुरुस्ती वेळेत झालेली नाही, तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या ऑनलाईन संच मान्यतेमध्ये अनेक प्रकारच्या दुरुस्त्या येत असूनही अनुदानित माध्यमिक शाळांपैकी ८८४ शाळांना सन २०२४ – २०२५ च्या संच मान्यतेमध्ये एकही शिक्षकाचे पद मंजूर करण्यात

आले नाही, तसेच सातारा जिल्ह्यातील ५९ शाळा ह्या शुन्य पदांच्या दाखविण्यात आल्या असून संच मान्यतेमुळे या शाळा बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिली ते पाचवीपर्यंत ६१ विद्यार्थ्यांसाठी ३ शिक्षक मिळत होते, आता नवीन निकषांमुळे ३ शिक्षकांसाठी ७६ विद्यार्थी शाळांना जोडावे लागणार असून सहावी ते आठवीपर्यंत एकवर्ग असल्यास ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक मिळायचा तर ३६ पटासाठी दोन शिक्षक दिले जात होते, तर आता ५३ पटानंतर दुसरा तर तिसऱ्या शिक्षकांसाठी ८८ विद्यार्थ्यांचा पट पाहिजे, तसेच स्वतंत्र मुख्याध्यापक देण्यासाठी पहिली ते पाचवीपर्यंत १५१ विद्यार्थी पाहिजेत तसेच एवढ्याच विद्यार्थ्यांसाठी पूर्वी सहा शिक्षक दिले जात होते, आगामी वर्षापासून आता सहाव्या शिक्षकासाठी १६६ विद्यार्थी हजेरी पटावर असावे लागणार असून सातारा जिल्ह्यातील ५९ शाळा संच मान्यतेमुळे बंद होणार असल्याने गरिब शिकणाऱ्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याने शासनाच्या या धोरणाच्याविरोधात जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षक संघटनानी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालार्थ आयडी देण्याबरोबरच संच मान्यता दुरुस्ती करण्याबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांच्यामार्फत संचालक पुणे येथे प्रस्ताव सादर केले जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डोंगराळ आदिवासी नक्षलग्रस्त व ग्रामीण भागात विद्यार्थी संख्या खूप कमी असल्याने या संचमान्यतेच्या निर्णयामुळे मराठी माध्यमाच्या शाळांवर याचा परिणाम होणार असून तुकडी टिकविण्याकरिता प्रती तुकडी आवश्यक असलेली किमान विद्यार्थी संख्या असलेल्या दिनांक २ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय, तसेच अनुदानित शाळांपैकी ४९८ शाळांना १ शिक्षक, ५१७ शाळांना २ शिक्षक आणि १५२१४ शाळांना ४ किंवा त्याहून अधिक शिक्षक पदे मंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संपूर्ण राज्यासाठी संचमान्यता दुरुस्तीकरिता पुणे हे एकच ठिकाण असल्याने, पुणे येथील कर्मचारी संचमान्यता दुरुस्तीकरीता सहकार्य करीत नसल्याने संच मान्यता दुरुस्तीची सुविधा विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर उपलब्ध करून देणेबाबत तसेच शिक्षकांशिवाय कार्यरत असलेल्या शाळा आणि सर्व विषय आणि वर्गांसाठी शिक्षक नसलेल्या शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनाची व्यवस्था करण्याबाबत व आरटीई २००९ मधील शिक्षक मंजुरीचे निकष, दिनांक २८/०८/२०१५ रोजीचा शासन निर्णय आणि यापूर्वीची संच मान्यतेची धोरणे याचा अभ्यास करून शिक्षक मंजुरीच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये विहित करण्यात आलेल्या संचमान्यतेच्या सुधारित निकषांनुसार आधार प्रमाणित विद्यार्थीसंख्येनुसार साधारण ७०० खाजगी व्यवस्थापनाच्या व १०३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांमध्ये इ. ९-१० वी च्या गटात ० पदे मंजूर झाली असल्याचे निदर्शनास आले असून त्यापैकी सातारा जिल्ह्यातील साधारण ५९ शाळांचा समावेश आहे. सदर शासन निर्णयातील इ. ९-१० वी च्या निकषामध्ये शिथिलता देण्याच्या

अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून यानुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) हे अंशत: खरे आहे. शाळेतील अंशत: अनुदानित व विनाअनुदानित शाळांच्या पदांमध्ये मूळ पायाभूत पदांच्या मर्यादेत दुरुस्ती शिक्षण संचालनालय स्तरावर करण्यात येते.
(४) हे खरे नाही. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्ये गटनिहाय विद्यार्थी पटसंख्येनुसार शिक्षक पदे मंजूर करण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ अन्वये संचमान्यतेचे निकष विहित करण्यात आले होते. सद्य:स्थितीत दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये सदर निकष अधिक्रमित करण्यात येऊन संचमान्यतेचे सुधारीत निकष विहित करण्यात आले आहेत.
(५) दिनांक २८/०८/२०१५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने तत्कालीन अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीच्या बैठका होऊन आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेचे सुधारीत निकष विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये दिनांक १९/०९/२०२४ व दिनांक ०९/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर व कर्नाटक सीमेलगतच्या अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास विरोध होत असल्याबाबत

**(२) * २५२७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर व कर्नाटक सीमेलगतच्या अलमट्टी धरणाची उंची पाच मीटरने ५१९ वरून ५२४ मीटर वाढविल्यास कोल्हापूर सांगलीसह सातारा जिल्ह्यातील महापुराची स्थिती काय असेल याचा फेरआढावा घेऊन रूरकी समिती आपला अंतिम अहवाल लवकरच शासनाला सादर करणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापुराच्या स्थितीमुळे शेतकरी उध्दवस्त होण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकरी आंदोलने करुन आपला संताप व्यक्त करीत आहेत व या घटनांच्या विरोधात हरकती केंद्र शासनाकडे दाखल करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी काही नागरिकांनी केंद्र शासनाकडे हरकती दाखल केलेल्या आहेत. त्यानुसार सदर हरकती P.G.(Public Grievance) portal व्दारे शासनास प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच, अलमट्टी धरण उंचीवाढ विरोधात सांगली-कोल्हापूर रोडवर अंकली पूलानजीक दिनांक १८/०५/२०२५ रोजी अलमट्टी धरणाची उंचीवाढ विरोधी सर्व पक्षीय संघर्ष समिती यांचेमार्फत चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते. तसेच अलमट्टी धरण उंचीवाढ विरोधात वर्तमानपत्रांमध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या असून काही निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) अलमट्टी धरणाची उंची ५१९.६० मी. वरुन ५२४.२६ मी. पर्यंत वाढविल्यास पश्चिम महाराष्ट्रात होणाऱ्या पूर परिस्थितीबाबत NIH, Roorkee यांचेमार्फत अभ्यास प्रगतीत आहे. सदर अभ्यास अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

आंध्रप्रदेश राज्याने अलमट्टी धरणाची उंचीवाढ व इतर बाबीं संदर्भात कर्नाटक राज्याच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या SLP साठी महाराष्ट्र राज्यामार्फत सावधानपत्र (Caveat) दाखल करण्यात आलेले आहे.

तसेच, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत मा.मुख्यमंत्री, कर्नाटक यांना तसेच मा.मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचेमार्फत मा.उपमुख्यमंत्री, कर्नाटक यांना अलमट्टी धरण उंचीवाढ न करणेबाबत पत्राव्दारे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस शिक्षक पदभरती प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याबाबत

**(३) * २२६६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सुनिल शिंदे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सचिन अहिर, श्री.संजय केणेकर, श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.योगेश टिळेकर, श्री.संदीप जोशी, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २ मे २०१२ पासून शिक्षक पदभरती बंदी असतानाही नागपूर व इतर अनेक जिल्हयांतील शाळांमध्ये सन २०१९ ते २०२५ या काळात सर्वाधिक शालार्थ आयडी तयार करण्यात आले असून, प्राथमिक वेतन प्रकरणात 'शालार्थ प्रणाली'मध्ये एकूण १ हजारांच्या वर अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे यादीत समाविष्ट केली असून ५८० अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या नियुक्तीसाठी १० ते ३० लाख रुपये रक्कम घेऊन त्यांना ५ वर्षे वेतन दिल्याने शासनाची सुमारे १०० कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे तसेच भंडारा जिल्ह्यातील एका शाळेत बनावट कागदपत्राच्या आधारे एका शिक्षकाला शिक्षक पदी नियुक्ती देऊन त्याला मुख्याध्यापक पदी पदोन्नती देण्यात आली तसेच याच जिल्ह्यातील वरठी येथील नवप्रभात शिक्षण संस्थेमध्ये तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सन २०२२-२३ या कार्यकाळात शिक्षकांना बनावट ठरावावरुन नियुक्ती देऊन शालार्थ आयडी दिली असल्याचे तसेच जळगाव जिल्ह्यातील १० माध्यमिक शिक्षण संस्थामधील ५४ शिक्षकांची बनावट शालार्थ आयडीच्या आधारावर भरती करून त्यांचे वेतन काढून

शासनाची कोट्यवधीची फसवणूक केल्या प्रकरणी नाशिक रोड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनातर्फे शिक्षक भरती बंद असताना नागपूर व इतर जिल्ह्यात शिक्षण विभागाने शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बनावट नियुक्ती करून शालार्थ आयडी दिल्याने पात्र उमेदवारांना संधी नाकारली गेली असून अपात्र व्यक्तींना शासनाच्या निधीतून वेतन देण्यात आल्याने शैक्षणिक व्यवस्थेवर व प्रशासकीय प्रक्रियेवर संशय निर्माण झाला असून शालार्थ आय.डी. घोटाळ्याचे मुख्य केंद्र हे नागपूर असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले असून सदरहू अपहार हा शिक्षणाधिकारी व शैक्षणिक संस्था यांच्या संगनमताने झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१९ ते २०२५ या काळातील उपरोक्त प्रकरणात तयार केलेल्या शालार्थ आयडी यांच्या नोंदीच नसल्याचे आढळून आले असून संबंधित १२ शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमत करून बनावट दस्तऐवजांच्या आधारे ही नियुक्ती प्रक्रिया केली असून बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळयात या विभागाचे शिक्षण उपसंचालक व माध्यमिक शिक्षण विभागाचा अधीक्षक व इतर कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई न करता त्यांच्यावर पंधरा दिवसांनी निलंबनाची कारवाई करण्यात आली असून याप्रकरणाची संपूर्ण राज्यात एस.आय.टी.द्वारे चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ मे, २०२५ व दिनांक १८ एप्रिल, २०२५ रोजी शासनास निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीत सहभाग असणाऱ्या संबंधित शिक्षणसंस्था, पदाधिकारी, दोषी कर्मचारी/अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करणे तसेच पगाराची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) राज्यातील नागपूर, भंडारा, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा नियमबाह्यरित्या शालार्थ प्रणालीमध्ये समावेश करुन वेतन अदा केले जात असल्याचे प्राथमिक चौकशीमध्ये निदर्शनास आल्याने सदर प्रकरणाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच शैक्षणिक संस्थेचे कर्मचारी/पदाधिकारी यांचेविरुध्द फ़ौजदारी गुन्हा दाखल करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास विशेष चौकशी पथकामार्फ़त करण्याची पोलीस विभागास विनंती करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत संचालक /सहसंचालक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणाशी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु केलेली आहे.
(४) व (५) फ़ौजदारी कार्यवाहीमध्ये नागपूर, नाशिक जिल्ह्यांमध्ये संबंधित दोषींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असून चौकशी सुरु आहे. तसेच जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु/प्रस्तावित आहे. सदर प्रकरणांची संचालक/सह संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या

अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीद्वारे सखोल चौकशी करुन नियमबाह्य शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतील प्रश्नपत्रिकेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा पुन्हा द्यावी लागणार असल्याबाबत

**(४) * २६१२ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सत्यजीत तांबे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध अभ्यासक्रमासाठी 'सीईटी सेल'च्या माध्यमातून माहे एप्रिल, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) महाराष्ट्र राज्य परीक्षा प्राधिकरणाच्या अक्षम्य चुकांमुळे २८,६३० विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा पुन्हा द्यावी लागणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सामायिक परीक्षा सेल मुंबई यांच्याकडून माहे एप्रिल, २०२५ मध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी व अभियांत्रिकी शाखेच्या प्रवेशाकरीता (एमएचटी-सीईटी) ही पीसीएम ग्रुपसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत गणिताच्या पेपर मध्ये ५० पैकी २० ते २५ प्रश्नांचे पर्याय चुकीचे असल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला असून, परीक्षा केंद्रावर या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या कोणत्याही तक्रारी स्वीकारण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेपर तयार करणाऱ्या कंत्राटी संस्थेच्या निष्काळजीमुळे व प्रश्नपत्रिकेतील अनेक त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचा शासकीय परीक्षांवरील विश्वास कमी होत असल्याने अशा घटना रोखण्याकरीता शासनाने कोणते धोरणात्मक निर्णय घेतले आहेत तसेच निष्काळजीपणामुळे पेपर तयार करणाऱ्या संबंधित दोषी कंत्राटी संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेली एमएचटी-सीईटी २०२५ ही सामाईक प्रवेश परीक्षा PCB आणि PCM ग्रुपकरीता दिनांक ०९ एप्रिल, २०२५ ते दिनांक २७ एप्रिल, २०२५ या कालावधीत एकूण २८ सत्रात पार पडली आहे.

सदरील २८ सत्रांपैकी २७ सत्रांमध्ये ६,७७,५६० उमेदवारांची परीक्षा सुरळीतपणे पार पडली असून, दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजीच्या सकाळच्या सत्रात तीन भाषांमध्ये (इंग्रजी, मराठी आणि उर्दू) घेण्यात आलेल्या PCM ग्रुपच्या परीक्षेदरम्यान २७,८३७ उमेदवार उपस्थित होते. सदरील उमेदवारांना गणित विषयाशी संबंधित इंग्रजी भाषांतरामधील २१ प्रश्नांमध्ये चुका असल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. मराठी आणि उर्दू प्रश्नांमध्ये कोणतीही त्रुटी अथवा चुक नव्हती.

इंग्रजी भाषांतरामध्ये त्रुटी / चुका आढळल्याने ज्या उमेदवारांनी दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात परीक्षा दिलेली होती, अशा उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी दिनांक ०५ मे, २०२५ रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली. सदर फेरपरीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे.

सदरील प्रकरणी संबंधित विषय तज्ज्ञांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्यानुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(५) * ३२०९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.धीरज लिंगाडे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वित्त विभागाचा दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ रोजीचा शासन निर्णय तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना ज्यांची नियुक्ती दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर झाली परंतु त्यांच्या पदाची जाहिरात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी प्रकाशित झाली होती अशा कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली असून मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या विना अनुदान व अंशत: अनुदान परंतु दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर १०० % अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करण्याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी निर्देश देऊन अशा सर्व शिक्षकांची माहिती सादर करण्याबाबत कळविले आहे तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील संस्थाना मुंबई मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठीचा प्रस्ताव अवगत करण्याची मागणी जुनी पेन्शन योजना कमिटीने शिक्षण अधिकाऱ्यांकडे केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विना व अंशतः अनुदानित शाळेत सेवेत लागलेले कर्मचाऱ्यांची संख्या २७ हजार असून दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शाळेला १००% अनुदान नसल्यामुळे भविष्य निर्वाह निधी तसेच नियुक्ती २००५ पूर्वीचे असल्यामुळे एनपीएस योजना लागू होत नाही तसेच यापैकी बऱ्याच जणांचे भविष्य निर्वाह निधी खाते एप्रिल, २०१४ पर्यंत नियमित सुरु असून या कर्मचाऱ्यांपैकी बऱ्याच जणांचे विना सूचना माहे एप्रिल, २०१४ पासून भविष्य निर्वाह निधी खाते बंद करण्यात आले असून भविष्य निर्वाह निधी किंवा एनपीएस खाते नसल्यामुळे सातव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते मिळालेले नाही तसेच व दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना विनाविलंब व विनाअट लागू करण्याबाबत शिक्षक, शिक्षकेतर व शिक्षक संघटनांकडून संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २८/०४/२०२५ च्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार शिक्षण विभागातील शिक्षण सेवा गट अ, ब शिक्षण सक्षमीकरण शाखेमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू केलेली असून दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विना व अंशतः अनुदानित शाळेत सेवेत

लागलेले २७ हजार कर्मचाऱ्यांतील जवळपास पाच ते सात हजार कर्मचारी सेवानिवृत्तिच्या मार्गावर आहेत व कित्येक सेवानिवृत्त झाले आहेत मात्र सेवानिवृत्तीनंतर कुठलाही मोबदला मिळण्याची हमी नाही या कर्मचाऱ्यांसमोर जुनी पेन्शन नसल्यामुळे एनपीएस नसल्यामुळे असे कर्मचारी आर्थिक संकटात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दि १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विना व अंशतः अनुदान शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणे बाबत तसेच शिक्षक संघटनांच्या व विविध शिक्षकांच्या शिष्टमंडळाने शिक्षण अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय.

अशा प्रकारच्या मागण्या विविध स्तरावरुन प्राप्त होत आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २८/४/२०२५ च्या शासन निर्णयानुसार शिक्षण विभागातील शिक्षण सेवा गट अ, ब शिक्षण सक्षमीकरण शाखेमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्यात आली आहे. मात्र विनाअनुदानित/अंशत: अनुदानित पदावरील नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक ३०/०४/२०१९ व दिनांक २६/०८/२०१९ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) कोणास लागू होते याबाबत स्पष्ट निर्णय दिला असून सदर न्यायनिर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आले आहे. सदर बाब मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०२३, त्यास अनुसरुन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन १४ जून, २०२३ अन्वये राज्यातील जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या (१) शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान, (२) रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान (३) १०० टक्के अनुदानित शाळेतील सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवानिवृत्ती उपदान मंजूर करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच, वित्त विभागाचे दिनांक २०/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS/DCPS) लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची (१) सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तसेच (२) केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तीवेतन योजना (UPS) यापैकी एका पेन्शन योजनेची (One Time Option) निवड करण्याबाबत पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १० ते १८ वयोगटातील मुलामुलींच्या आत्महत्यांचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(६) * २७७३ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० ते १८ वर्षे वयोगटातील मुलामुलींच्या आत्महत्यांचे प्रमाण गेल्या काही वर्षांत लक्षणीय वाढले असून शैक्षणिक ताण, परीक्षेतील अपयश, कौटुंबिक कलह, लैंगिक अत्याचार, ऑनलाईन ट्रोलिंग आणि मानसिक आरोग्याविषयी उदासीनता यासारखी कारणे यामागे असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शाळा-महाविद्यालयांमध्ये 'मनोबल' योजनेची व्याप्ती वाढवून आणि हेल्पलाइन सेवा सुरू करून ४२६ शाळांमध्ये समुपदेशक नियुक्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ५ वर्षांतील १०-१८ वयोगटातील आत्महत्यांची जिल्हानिहाय आकडेवारी किती आहे तसेच 'सक्षम बालक अभियान' सारखे उपक्रम राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत भविष्यातील करिअर संधी संदर्भातील विविध स्पर्धा परीक्षा, या परीक्षांची तयारी तसेच परीक्षेदरम्यान येणाऱ्या ताण-तणावाचे व्यवस्थापन इ. विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यातील तज्ञ व्यक्तींमार्फत ऑनलाईन पद्धतीने वेबिनारचे प्रसारण केले जाते. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअर तसेच परीक्षेतील ताण-तणाव बाबत समुपदेशन करण्यासाठी राज्यातील विविध शाळांवर काम करणाऱ्या ३५७ शिक्षक समुपदेशकांची यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात निर्गमित केलेल्या दि. १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, विद्यार्थी मानसिक दबावाला बळी पडू नयेत म्हणून शाळा व्यवस्थापनाने शाळेत समुपदेशनाची व्यवस्था करावी, खाजगी (स्वयंअर्थसहाय्यित) शाळांनी त्यांच्या शाळेमध्ये प्रशिक्षित, विहित अर्हताप्राप्त व अनुभवी समुपदेशकाची नियुक्ती करावी, शासकीय-स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व अनुदानित शाळा यांनी त्यांच्या शाळेतील एक शिक्षक समुपदेशक म्हणून नियुक्त करावा व या शिक्षक/समुपदेशकाला महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्याद्वारे प्रशिक्षित केले जावे, जटिल समस्यांसाठी प्रशिक्षित समुपदेशकांचे पॅनेल उपलब्ध असावे, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्रातील ३६ पैकी ३४ जिल्ह्यांमध्ये स्टार्स प्रकल्पांतर्गत राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मानसिक आरोग्य जागरूकता शिबिर कार्यक्रम सन २०२३-२४ मध्ये राबविण्यात आले आहेत. प्रत्येक जिल्ह्यातून इयत्ता ७ वी, ८ वी व ९ वी च्या वर्गाला शिकविणारे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील किमान १०० शिक्षकांना जिल्हा स्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षण सत्रादरम्यान शिक्षकांना सायबर सुरक्षा, सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श आणि हेल्पलाइन नंबरबद्दल शिक्षित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवोदय अर्बन को-ऑप. बँक, नागपूर आणि रामानंद मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी, ठाणे यांच्या प्रशासनावर कारवाई करण्याबाबत

**(७)** * **३१४५ श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवोदय अर्बन को-ऑप. बँक, नागपूर आणि रामानंद मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, ठाणे ह्या दोन्ही बँका दिवाळखोरीत निघाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ह्या बँकांची चौकशी करुन बँक प्रशासनावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच दोन्ही बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) नवोदय अर्बन को-ऑप. बँक, नागपूर या बँकेचे सन २०१५ ते २०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, भंडारा यांनी केले आहे. सदर लेखापरिक्षण अहवालात बँकेच्या चुकीच्या निर्णयामुळे तसेच आर्थीक अपहारामुळे बँकेस रुपये ४५.५८ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झाले आहे. सदर अपहाराच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन, धंतोली येथे अफराध क्रमांक १८१/१९ (एफ.आय.आर.) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत आर्थीक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचेव्दारे चौकशी सुरू आहे. सहकार आयुक्तांच्या दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या आदेशाने बॅकेची कलम ८८ अन्वये चौकशी सुरू केली आहे. परंतु, आर्थिक गुन्हे शाखेने रेकॉर्ड जप्त केल्यामुळे अद्याप चौकशी झालेली नाही.

सहकार आयुक्तांच्या दिनांक ०९/१०/२०१८ रोजीच्या आदेशाने सदर बँक अवसायनात घेतली असून बँकेवर अवसायकाची नियुक्ती केली आहे. अवसायन तारखेस बँकेच्या रुपये ५२५७.२८ लाख ठेवी असून ठेवीदारांची संख्या १२,८४७ इतकी आहे. तसेच कर्ज रुपये ७६३१.८० लाख आहे.

डि.आय.सी.जी.सी. मुंबई यांचेकडून नियमाप्रमाणे रुपये एक लाखापर्यंत ठेवी असलेल्या ठेवीदारांना ठेवी वाटप करणे सुरू आहे. आजपर्यंत डि.आय.सी.जी.सी. ने २०१८ ठेवीदारांची रक्कम रुपये १३७७.२२ लाखाचे वाटप केले आहे. उर्वरीत ६३७ ठेवीदारांचे रुपये ५२८.८७ लाख देणे बाकी आहे.

रामानंद मल्टीस्टेट को- ऑफ सोसायटी लि. ठाणे ही संस्था बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ अन्वये नोंदणी झालेली बहुराज्यीय सहकारी संस्था असून ती मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अधिकार व नियंत्रण कक्षेत येते. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम ८४ (४) अन्वये लवाद नियुक्त करणे व कलम १०८ अन्वये संस्थेची तपासणी करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही वैधानिक अधिकार राज्याच्या निबंधकास नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाची थकीत देयके अदा करण्याबाबत**

**(८) * २८३४ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखर गळीत हंगाम संपून जवळपास दोन महिने झाले तरी अद्याप बहुतांश साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची उसाचे रास्त आणि किफायतशीर दर देयके (एफआरपी) दिली नसल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी, विवाहासाठी, कौटुंबिक गरजांसाठी तसेच औषध उपचारासाठी पैशाची आवश्यकता असते, परंतु उसाचे रास्त आणि किफायतशीर दर देयके (एफआरपी) वेळेत न दिल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गळीत हंगाम सन २०२४-२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये साखर कारखान्यांकडे जवळपास २०० कोटी शेतकऱ्यांचे उसाचे रास्त आणि किफायतशीर दर देयके (एफआरपी) थकीत आहेत, त्याचप्रमाणे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील २१ साखर कारखान्यांकडे जवळपास १३५ कोटी रुपयांची उसाचे रास्त आणि किफायतशीर दर देयके (एफआरपी) थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उसाचे रास्त आणि किफायतशीर दर देयके (एफआरपी) एकाच हप्त्यात आणि १४ दिवसांच्या आत देणे बंधनकारक असतानादेखील शेतकऱ्यांना उसाचे दर देयके (एफआरपी) न देणाऱ्या संबंधित दोषी साखर कारखान्यांवर तसेच शेतकऱ्यांना उसाचे दर देयके (एफआरपी) देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील गाळप केलेल्या एकूण २०० सहकारी/ खाजगी साखर कारखान्यांच्या रुपये २३,८०१ कोटी देय एफ.आर.पी.पैकी माहे जून, २०२५ पर्यंत रुपये २,३२,७७.६१ कोटी एवढी एफ.आर.पी. ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना कारखान्यांनी अदा केली आहे. त्याची एकूण टक्केवारी ९७.८० टक्के आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण ३३ साखर कारखान्याने गाळप घेतले असून सदर कारखान्यांकडे निव्वळ देय एफ.आर.पी. रुपये २,५५,३५५.३३ लाख पैकी रुपये २,४३,०९७.८३ लाख इतकी एफ.आर.पी. अदा केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण २३ साखर कारखान्यांनी १२५.३७ लाख मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. सदर गाळपावरील देय एफ.आर.पी रुपये ३,९६,९४५.४९ लाख पैकी रुपये ३,९२,३८०.५८ लाख इतकी रक्कम ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना अदा केली आहे. तसेच सांगली जिल्ह्यातील एकूण १७ साखर कारखान्यांनी ७७.३८ लाख मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. गाळप झालेल्या ऊसावरील देय एफ.आर.पी. रक्कम रुपये २,३७,७१७.४४ लाख पैकी रुपये २,३५,०१८.४४ लाख इतकी रक्कम ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना अदा केली आहे.

(४) ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ चे कलम ३(३) मधील तरतुदीनुसार विहीत मुदतीमध्ये एफ.आर.पी. अदा न करणाऱ्या २८ साखर कारखान्यांविरूध्द साखर आयुक्त, पुणे यांचेमार्फत वसूली प्रमाणपत्र निर्गमित करून संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांना वैधानिक कारवाईकरीता आदेशित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोट तालुका सहकारी सुत गिरणीची (ता.अकोट, जि.अकोला) अल्प किंमतीत विक्री करण्यात आल्याबाबत

**(९) * ३४३१ श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट तालुका सहकारी सुत गिरणी (ता.अकोट, जि.अकोला) सन १९९८ मध्ये बंद पडली असून त्यामध्ये ६६२ कामगार काम करीत होते, सदरच्या सहकारी सुत गिरणीची किंमत अंदाजे ७५ कोटी रुपये असून सदरची सहकारी सुत गिरणी अतिशय गोपनीयरित्या श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्सला रुपये ११ कोटी ८७ लाख एवढ्या अत्यंत अल्प किंमतीत विक्री करण्यात आली असून तेथील कामगारांची सुमारे १४ कोटी ८५ लाख इतकी थकित देणीदेखील कामगारांना अदा करण्यात आली नसल्याचेही माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरच्या सहकारी सुत गिरणीची किंमत अंदाजे ७५ कोटी रुपये असूनही गोपनीयरित्या श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्सला रुपये ११ कोटी ८७ लाखास विक्री करणाऱ्या तसेच तेथील कामगारांची १४ कोटी ८५ लाख इतकी थकित देणी अदा न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

अकोट तालुका सहकारी सुत गिरणी मर्या., या संस्थेची मालमत्ता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने रुपये ११६७.११ लाख रकमेस विक्री केल्याचे व सदर सुतगिरणीमधील कामगारांची एकूण देणी ११६६.८३ लाख अदा करणे बाकी असल्याची बाब खरी आहे.

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने अकोट तालुका सहकारी सुतगिरणी मर्या., ता.अकोट, जि.अकोला या संस्थेची मालमत्ता रुपये ५१.०२ कोटी एवढया थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सरफेसी कायदा, २००२ अंतर्गत दिनांक ११/०७/२००७ रोजी ताब्यात घेतली होती. सदर कायद्यातील तरतूदींनुसार सुतगिरणीची मालमत्ता विक्रीसाठी २४ वेळा दैनिक लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता व फायनान्शियल एक्सप्रेस (इंग्रजी) अशा अग्रगण्य वर्तमान पत्रांमध्ये वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेत बँकेस २३ वेळा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. बँकेने दिनांक ०५/०१/२०२२ रोजी २४ व्या वेळी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये २ निविदाधारकांचा प्रतिसाद मिळाला आहे. सदर निविदा प्रक्रियेच्या वेळी सुतगिरणीकडे बँकेच्या रुपये ५८१९.४१ लाख रकमेची थकबाकी होती.

बँकेच्या पॅनलवरील शासन मान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे. महाराष्ट्र व्हॅल्युअर्स व श्री.आर.के. पटेल यांचेकडून सुतगिरणीच्या मालमत्तेचे मुल्यांकन करण्यात आले होते. त्यापैकी उच्चत्तम मुल्यांकन अहवालानुसार सुतगिरणीची मालमत्ता विक्री करण्यासाठी दिनांक ०५/०१/२०२२ रोजीच्या दै. लोकसत्ता व फायनान्शियल एक्सप्रेस या अग्रगण्य वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. बँकेचे मुल्यांकनकार यांच्या अहवालानुसार सुतगिरणीच्या मालमत्तेचे रियलायझेबल मुल्य रुपये ११४७.६९ लाख ही रक्कम बँकेने राखीव किंमत म्हणून निश्चित केली होती.

सदर निविदा काढताना सरफेसी कायदा, २००२ मधील तरतुदीनुसार सुतगिरणीस ३० दिवसांची नोटीस देण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये मे. श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स व खुशी कॉस्टपीन प्रा.लि. हे दोन निविदाधारक टेक्नीकल बिडमध्ये यशस्वी झाले होते. फायनान्शियल बिडमध्ये मे. श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स, अमरावती यांची निविदा रुपये ११६५.११ लाख इतक्या सर्वाधिक रकमेची होती. श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स, अमरावती यांची वाटाघाटीनंतर रुपये ११६७.११ लाख ही निविदा रक्कम अंतिम केली. त्यानुसार सदर रक्कम दिनांक ०८/०६/२०२२ रोजी बँकेत जमा झाल्यानंतर श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स, अमरावती यांना दिनांक ०९/०९/२०२२ रोजी बँकेने विक्री प्रमाणपत्र (सेल सर्टिफिकेट) दिले आहे.

खरेदीदार यांनी सुतगिरणीवरील विक्रीपूर्वीच्या व भविष्यातील सर्व देयतांची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यामध्ये कामगारांच्या देयतेचाही समावेश आहे.

दरम्यान, सुतगिरणीचे अवसायक यांनी सुतगिरणीच्या मालमत्तेबाबत बँकेने दिनांक ०९/०९/२०२२ रोजी दिलेले विक्री प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत डिसेंबर, २०२३ मध्ये कर्जवसुली न्यायाधिकरण, नागपूर (DRT) येथे अर्ज क्र. २५/२०२४ दाखल केला असून या प्रकरणी न्यायाधिकरणाने अद्याप कोणतेही अंतरिम आदेश दिलेले नाहीत.

सदर मालमत्ता विक्री व्यवहारामध्ये खरेदीदाराने मालमत्तेवरील देण्यांची जबाबदारी स्वीकारली असल्याने आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी मालमत्ता खरेदीदार मे. श्रीकृष्ण कॉटन ट्रेडर्स, अमरावती यांचेकडे पत्रव्यवहार करुन देय रकमा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील क्रीडा संकुलांच्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१०) * ३१२८ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट, सेलू, वर्धा, देवळी, आर्वी, आष्टी या तालुक्यांतील क्रीडा संकुलांमध्ये सोयीसुविधा करण्याकरीता मंजूर केलेल्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.क्रीडा राज्यमंत्री यांना दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२५ रोजी पत्राद्वारे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भ्रष्टाचाराची चौकशी करून वर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी व तालुका क्रीडा अधिकारी यांच्यावर कारवाई करून वरिष्ठ अधिकारी व पोलीस यंत्रणेमार्फत सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.क्रीडा राज्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ रोजी निवेदन दिले आहे.

(२) होय.
(३) आयुक्त, क्रीडा यांनी दिनांक ५/६/२०२५ अन्वये उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर यांना प्राथनिक चौकशी करण्याबाबत कळविले आहे. सदर चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ऊस तोडणी मुकादमांकडून शेतकरी व वाहतूकदारांची फसवणूक होत असल्याबाबत

**(११) * २३०१ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांमध्ये ऊस तोडणीसाठी कार्यरत असलेल्या मुकादमांकडून शेतकऱ्यांची सुमारे १८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यात ऊस तोडणीसाठी कार्यरत असलेल्या मुकादमांकडून फसवणूक केल्या प्रकरणी एकूण १११ तक्रारी प्राप्त झाल्या असून ऊस तोडणी मुकादमांकडून शेतकरी तसेच वाहतूकदार यांची फसवणूक सातारा जिल्ह्यातच नव्हे तर अन्य भागांतही मोठ्या प्रमाणावर केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातारा जिल्ह्यातील व अन्य भागात ऊस तोडणी मुकादमांकडून शेतकरी तसेच वाहतूकदार यांची करण्यात येणारी फसवणूक रोखण्याकरिता शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) शासन पत्र दिनांक ०७/०३/२०२५ नुसार "साखर कारखाना व्यवस्थापन, वाहतूकदार, मुकादम आणि ऊस तोडणी कामगार यांच्यातील उचल (अग्रिम) रक्कम वाटप" या आर्थिक व्यवहारास स्वतंत्र कायदा करून या व्यवहारास कायदयाच्या कक्षेत आणणेबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व त्याअनुषंगाने शासनामार्फत कायदा पारीत होण्याच्या दृष्टीने विधेयकाचा (बिलाचा) मसुदा विधि व न्याय विभागास दिनांक २५/०६/२०२५ रोजी अभिप्रायार्थ सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील स्काऊट गाईडच्या विभागीय कार्यालयातील अधिकारी /कर्मचाऱ्यांचे समावेशनाबाबत

**(१२) * २९८२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्काऊट गाईडची ८ विभागीय कार्यालये बंद करावीत असे धोरण क्रीडा व युवक कल्याण विभागाने राबविल्याने सदर विभागीय कार्यालयात कार्यरत असणारे ८ अधिकारी मुंबई कार्यालयात तर १६

कर्मचारी वर्गाचे जिल्हा स्काऊट गाईड कार्यालयात समावेशन केले असल्याचे माहे मार्च, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ विभागीय कार्यालयांचा आकृतिबंध नसल्याने स्काऊट गाईडची ही कार्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने क्रीडा क्षेत्रात आपले भवितव्य घडवू पाहणाऱ्या युवकांना मिळणाऱ्या अनेक योजनांपासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २० सप्टेंबर, २०११ च्या आकृतीबंधामध्ये शासन निर्णयात २९७ पदांना शासनाने मान्यता दिली मात्र या पदांची विगतवारी करून आयुक्त कार्यालयामार्फत शासनाला प्रस्ताव पाठविला नसल्याने ही विभागीय कार्यालये बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २० सप्टेंबर, २०११ च्या आकृतीबंधामध्ये शासन निर्णयातील २९७ पदांना शासनाने मान्यता देऊनही या पदांची विगतवारी करून आयुक्त कार्यालयामार्फत शासनाला प्रस्ताव न पाठविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच क्रीडा क्षेत्रात करिअर घडविणाऱ्या युवकांना सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील आठ स्काऊट गाईडच्या कार्यालयांना वित्त विभागाची मंजुरी न घेताच कोणत्या आधारावर पदे निर्माण केली व या कर्मचाऱ्यांना आतापर्यंत शासन कशाच्या आधारावर वेतन देत होते, याला जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

आकृतीबंधामध्ये विभागीय कार्यालये अथवा पदे मंजूर नसल्याने, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा तथा राज्य मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स, यांनी विभाग प्रभारी म्हणून संस्थेतील संबंधित अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्याचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(२) हे खरे नाही.

युवकांच्या योजना जिल्हा व राज्य स्तरावर राबविण्यात येत आहेत.

(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स या संस्थेच्या मंजूर आकृतीबंधात विभागीय कार्यालये अथवा त्यासाठीची पदे मंजूर नाहीत. त्यामुळे विभागीय कार्यालये बंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आकृतीबंधाव्यतिरिक्त कोणतीही पदे निर्माण करण्यात आलेली नाहीत. केवळ आकृतीबंधातील मंजूर पदांसाठी शासन अनुदान दिले जाते. त्यामुळे, कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ३१७२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ८१ शाळा अनधिकृत आढळून आल्याने या ८१ शाळांविरोधात ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली असून त्यापैकी ६८

शाळांविरोधात पोलीसांनी प्रथम खबरी अहवाल नोंदविला असून उर्वरीत १३ शाळांविरोधात प्रथम खबरी अहवाल नोंदविण्याची कार्यवाही पोलीस प्रशासनाकडून सुरू असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ८१ अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या जवळपास २० हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याकरीता विद्यार्थ्यांचे खाजगी शाळांमध्ये समायोजन करण्यात येणार असल्यास त्यांच्या फीची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतचा तपशील व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, या अनधिकृत शाळांवर फौजदारी कारवाई सोबतच शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली आहे तसेच संबंधित शाळांकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील व सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ८१ अनाधिकृत शाळांमध्ये एकूण १९७०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन अधिकृत शाळांमध्ये करण्याकरीता संबंधित मान्यता प्राप्त शाळा व्यवस्थापनासोबत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत.

सदर विद्यार्थ्यांच्या समायोजनाच्या अनुषंगाने मान्यता प्राप्त शाळांनी त्यांच्या शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत देण्याचे मान्य केले आहे. तसेच अनधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत सभा घेऊन, विद्यार्थ्यांचे समायोजन येत्या शैक्षणिक वर्षामध्ये नजिकच्या अधिकृत शाळेमध्ये करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८(५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरू असणाऱ्या शाळांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देश शासन निर्णय, दिनांक १९/०६/२०१०, दिनांक १०/११/२०२० व दिनांक १८/१२/२०२३ द्वारे देण्यात आले आहेत. त्यानुसार शाळेच्या व्यवस्थापनास रुपये १ लाख दंड व सूचना देऊनही शाळा बंद न केल्यास रुपये १०,०००/- प्रतिदिवशी इतका दंड ठोठावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अनधिकृत शाळांना आकारण्यात आलेल्या दंडाची वसुली मालमत्ता कर विभागामार्फत सुरु आहे.

तसेच, ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत शाळांच्या इमारती अनधिकृत आहेत किंवा कसे, याबाबत तपासणी करुन अनधिकृत इमारतीवर नियमोचित कार्यवाही करण्याबाबत अतिक्रमण विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच, ठाणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत अनधिकृत शाळांच्या इमारतीचा पाणीपुरवठा बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील शाळांमधील  विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाल्याबाबत

**(१४) * ३०९६ श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजहंस सिंह, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी माध्यमांच्या शाळांमधील पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याने १५ वर्षात २२ हजार खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमधील तब्बल ७२ हजार शिक्षक-शिक्षकेतरची पदे घटली असल्याने मागील सहा वर्षात शाळांमधील १८ लाख ५५ हजार ७२३ विद्यार्थीसंख्या घटली असून शाळांची संख्याही १,७०५ ने घटली असल्याचे माहे मार्च,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शाळांकडे विद्यार्थ्यांचा कमी झालेला कल, ग्रामीण भागातील नागरिकांचे रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर झाल्याने विद्यार्थी संख्या घटली असून त्यामुळे शिक्षकांची पदे कमी झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती घेऊन मराठी शाळांमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सोयीसुविधा देऊन विद्यार्थ्यांची गळती रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पटसंख्येमध्ये वाढ होण्याकरीता राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या धर्तीवर अभ्यासक्रम लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच प्रधानमंत्री पोषण शक्ती आहार योजना, मोफत पाठयपुस्तके, मोफत गणवेश, शिष्यवृत्ती, शाळा प्रवेशोत्सव, भौतिक सुविधा, अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य पुरवठा व इतर योजनांच्या माध्यमातून पटसंख्येमध्ये वाढ करण्याकरीता कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) * ३०२१ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची ८५२ पदे रिक्त असून यापैकी मराठी माध्यमाच्या ७२४ पदे, उर्दू माध्यमाच्या ४० आणि कन्नड माध्यमाच्या ८८ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवित्र पोर्टलद्वारे घेण्यात येणाऱ्या शिक्षक भरतीच्या शिक्षण संस्थांच्या जाहिरातीस सातत्याने शासनाकडून मुदतवाढ मिळत असल्याने भरती प्रक्रियेस विलंब होत आहे तसेच शिक्षकांच्या रिक्त असलेल्या जागांमुळे कामाचा अतिरिक्त ताण सध्या कार्यरत असलेल्या शिक्षकांवर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या शैक्षणिक वर्षात शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनानंतर मराठी माध्यम ३२३, कन्नड माध्यम ७४ व उर्दू माध्यम ४ अशी एकूण निव्वळ रिक्त पदे ४०१ आहेत.

(२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार दूसऱ्या टप्प्यातील शिक्षक भरतीप्रक्रियेकरीता पवित्र पोर्टलवर दिनांक २०/०१/२०२५ पासून जाहीरात देण्याची मूभा देण्यात आली होती. खाजगी शैक्षणिक संस्थांना सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांचेकडून बिंदुनामावली तपासणीसाठी लागणारा कालावधी व त्यामुळे वेळोवेळी पोर्टलवर जाहिरातीस मिळालेला अल्प प्रतिसाद विचारात घेता मुदतवाढ देणे आवश्यक होते. त्यामुळे पोर्टलवर दिनांक १५/०४/२०२५ पर्यंत जाहीरात घेण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार टप्पा-२ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदभरती या प्रकारात १११४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे व मुलाखतीसह या प्रकारातील उमेदवारांची शिफारस करण्याची कार्यवाही सुरु आहे.

खाजगी शिक्षण संस्थांना त्यांचे मागणीनुसार पवित्र पोर्टलमार्फत शक्य तितक्या लवकर शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने कार्यरत शिक्षकांवर अतिरिक्त ताण न येता अध्यापनाचे काम सुरळीतपणे पार पाडणे शक्य होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार तालुक्यातील तापी-बुराई उपसा सिंचन योजनेतील प्रलंबित कामे पुर्ण करण्याबाबत

**(१६) * २७५६ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुक्यातील पूर्वपट्टा म्हणजेच रनाळे, शनिमांडळ या महसुली भागासह संपूर्ण नंदुरबार तालुक्यात अत्यंत कमी पाऊस होत असल्यामुळे कायम दुष्काळी परिस्थती निर्माण होत असल्याने शासनाने तापी-बुराई उपसा सिंचन योजना मंजूर केली असून सदर योजना अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार हा कायम दुष्काळग्रस्त भाग असताना तापी-बुराई उपसा सिंचन योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर योजनेमधील कामे ही अत्यंत संथ गतीने सुरु आहेत. तसेच याबाबत वेळोवेळी मागणी करुनही शासनाकडे बैठका आयोजित केल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तापी-बुराई उपसा सिंचन योजनेचे कामाला गती मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून मा.जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी, कोकण विकास) यांना दिनांक ७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने नंदुरबार तालुक्यातील तापी-बुराई उपसा सिंचन योजनेतील अपूर्ण व पुढील उर्वरित कामांना गती देऊन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पास दिनांक ०२/०२/१९९९ अन्वये रुपये ११०.१० कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली होती.

सदर योजनेच्या प्रथम सुप्रमा अहवालास शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये रुपये ७९३.९५ कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर योजनेचे टप्पा क्र.१ मधील उर्ध्वनलिकेचे काम ९५% पूर्ण व हाट मोहिदा येथील पंपगृहाचे काम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या टप्प्यातील उर्ध्वनलिकेचे काम ८० टक्के पूर्ण झालेले असून पंपगृहाचे काम ४० टक्के पूर्ण झालेले आहे. तसेच साठवण तलाव निंभेल मातीधरणाच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

सदर प्रकल्पास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षा करीता रुपये ३०.०० कोटी निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे व प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून जून-२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या प्रथम सुप्रमा अहवालास शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये रुपये ७९३.९५ कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली आहे.

तापी बुराई उपसा सिंचन योजनेच्या कामांबाबत मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे अध्यक्षतेखाली मा.लोकप्रतिनिधी सोबत दिनांक १७/०६/२०२५ रोजी आढावा बैठक झाली. सदर बैठकीत प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांनी निर्देश दिले आहेत.

(३) व (४) तालुक्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तापी-बुराई उपसा सिंचन योजनेचे कामाला गती मिळण्यासाठी मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन यांचे अध्यक्षतेखाली मा.लोकप्रतिनिधीं यांचे समवेत दिनांक १७/०६/२०२५ रोजी मंत्रालय, मुंबई येथे सदर प्रकल्पाच्या कामाच्या गतीबाबत आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांनी निर्देश दिले आहेत.

प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून जून-२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून विदेशी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज वितरणास विलंब झाल्याबाबत

**(१७) * ३४८६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, जैन, पारशी आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील ३०० विद्यार्थ्यांना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात विदेशी शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज मिळाले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना तातडीने शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक ८ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अल्पसंख्यांक समाजातील ३०० विद्यार्थ्यांना मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०२४-२५ मध्ये एकूण ७१ विद्यार्थ्याना रुपये १२,०१,५२,५००/- इतक्या रकमेचे विदेशी शैक्षणिक कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. २७ विद्यार्थ्यांचे रुपये ५,३१,४७,०००/- इतक्या रकमेचे प्रस्ताव प्रलंबित आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक एवं वित्त निगम, नवी दिल्ली (NMDFC) यांचेकडून कर्ज घेवुन राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना विदेशी शिक्षणाकरीता डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम योजनेतंर्गत शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. राष्ट्रीय अल्पसंख्याक एवं वित्त महामंडळास राज्य हिस्स्यातील भाग भांडवलाची रक्कम अदा करण्यासाठी रुपये ३८.०५ कोटी रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांना कर्ज मंजूर करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात शाळा हस्तांतरणाचे बनावट आदेश तयार करून शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(१८) * २४४९ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात बनावट शाळा हस्तांतरण आदेश तयार करून शासनाची फसवणूक करणाऱ्या संस्थेवर कारवाई करण्यासाठी दिरंगाई करणाऱ्या विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिनांक १३ मार्च, २०२५ व दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बनावट शाळा हस्तांतरण आदेश तयार करून शासनाची फसवणूक करणाऱ्या संस्थेवर कारवाई करण्यासाठी दिरंगाई करणाऱ्या विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राज्य शासनास प्राप्त दोन तक्रारी शासन पत्र क्र. संकिर्ण-११२५/प्र.क्र.१/एस एम-१ दिनांक १३/०३/२०१५ व दिनांक १७/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग, नाशिक यांना उचित कारवाईसाठी पाठविण्यात आले आहेत.

(२) व (३) सखोल तपासणीअंती दोषी आढळल्यास संबंधिताविरुध्द आवश्यक कारवाई करण्यात येईल.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील प्राथमिक विभागाच्या ९ व माध्यमिक विभागाच्या ४ शाळा अनधिकृत असल्याबाबत

**(१९) * २२८६ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील प्राथमिक विभागाच्या आकृती एज्युकेशन स्कुल- उलवे, न्यू इंग्लिश स्कुल- नेरे, किड्स गार्डन स्कुल- टेमघर, एस.जी.टी. स्कुल- करंजाडे, साई गणेश स्कुल- खारपाडा, वेदिक स्कुल- करंजाडे सेक्टर-३, वेदगृह स्कुल- करंजाडे सेक्टर-४, दि बुद्धीष्ट स्कुल- ओवळे व सनराईस स्कुल- वावंजे (ता.पनवेल, जि.रायगड) या ९ शाळा तसेच माध्यमिक विभागाच्या दि बुद्धीष्ट स्कुल- करंजाडे, कै. मंजुळा त्रिंबक ठाकूर शाळा- पाले बुद्रुक कोळवाडी, ज्ञानाई माध्यमिक विद्यालय- धामणी- वाजे व न्यू इंग्लिश स्कुल - कोपरा या ४ शाळा अनधिकृत असल्याची यादी मा.गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पनवेल यांनी जाहीर करून पालकांनी आपल्या मुलांचा या शाळेत प्रवेश घेऊ नये असे सांगितले असल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत असलेल्या या प्राथमिक विभागाच्या ९ व माध्यमिक विभागाच्या ४ शाळांवर शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या कलम १८(५) मधील तरतुदीनुसार शासन मान्यतेशिवाय अनधिकृतरित्या सुरू असणाऱ्या शाळांविरूध्द कारवाई करण्याचे निर्देश शासन निर्णय, दिनांक १९/०६/२०१०, दिनांक १०/११/२०२० व दिनांक १८/१२/२०२३ द्वारे देण्यात आले आहेत. त्यानुसार शाळेच्या व्यवस्थापनास रुपये १ लाख दंड व सूचना देऊनही शाळा बंद न केल्यास रुपये १०,०००/- प्रतिदिवशी इतका दंड ठोठावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्यानुसार, उक्त शाळांना गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पनवेल यांनी शाळा बंद करण्याबाबत तसेच, द्रव्यदंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशिम येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रातील वरिष्ठ लिपिक यांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राबाबत

**(२०) * २५१९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये नियुक्त झालेल्या दिव्यांग उमेदवारांकडून सादर करण्यात आलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र अवैध असल्याचे निदर्शनास आल्याने दिव्यांग उमेदवारांना शासन मान्य संस्थेकडून वैद्यकीय तपासणी करून प्रमाणपत्राची शहानिशा करण्याचे निर्देश संबंधितांना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे कार्यरत असलेले वरिष्ठ लिपिक यांनी कर्णबधीर दिव्यांगत्वाची बनावट कागदपत्रे सादर केल्यामुळे त्यांना विभागाकडून वैद्यकीय तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतचे निर्देश दिले असूनही त्यांनी दीर्घकाळ अनुपस्थित राहून वैद्यकीय तपासणी अहवाल अद्याप सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने वैद्यकीय तपासणी करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर तसेच बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन तात्काळ निलंबित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) अंशत: खरे आहे.

अध्यक्ष, "दिव्यांग कल्याण मंत्रालय दिव्यांगांच्या दारी" अभियान, दिव्यांग कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०७/०८/२०२४ च्या पत्रान्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दिव्यांगत्व उमेदवारांची यादी सादर करुन त्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याचे निदेश दिले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दिनांक

०७/१०/२०२४ च्या पत्रान्वये उपरोक्त यादीतील कार्यरत दिव्यांग उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची फेरतपासणी करण्याचे निर्देश संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

अध्यक्ष, अपंग निर्देशी मंडळ, अकोला तथा उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला यांच्यामार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व मार्गदर्शन केंद्र, वाशिम येथील श्री.दिपक श्रीराम भोळसे, वरिष्ठ लिपिक यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची फेरतपासणी करण्यात आली आहे. सदर तपासणीअंती अध्यक्ष, अपंग निर्देशी मंडळ, अकोला तथा उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला यांनी श्री.भोळसे यांचे कर्णबधीर प्रमाणपत्र क्र. MH०६१००१९८१०११८६०३ - Hearing Impairment, ४४% Permanent Disability चे प्रमाणपत्र योग्य असल्याबाबतचा अहवाल दिनांक ०३/०६/२०२५ च्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, वाशिम व सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम यांना सादर केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये किमान मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) * २७३७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये पायाभूत सुविधा असणे आवश्यक असताना राज्यातील अंदाजे १० हजार ३९७ शाळांमध्ये पाण्याची सोय नसल्याचे तसेच जवळपास ५ हजार ८५१ शाळांमध्ये वीज नसल्याचे व ७ हजार ४१९ शाळांमध्ये ग्रंथालय नसल्याचे महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ व यु-डायस प्लस अहवालातून माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध अधिकाऱ्यांकडून तसेच स्क्वॉफ सारख्या स्वयंमुल्यांकनाद्वारे आढावा, ॲपद्वारें केलेले सर्वेक्षण आदी तपासणीनंतर मुंबईतील अनेक शाळांमध्ये किमान पायाभूत सुविधा नसणे, पक्क्या इमारतीच नसणे, पत्र्याच्या शेडमध्ये शाळा भरत असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करणे, वीज व ग्रंथालय अशा मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) समग्र शिक्षातंर्गत ४८६ शाळांना सौर ऊर्जा संच उपलब्ध करण्यात आलेले आहे. समग्र शिक्षातंर्गत २८१७५ प्राथमिक, १९५७५ उच्च प्राथमिक, माध्यमिक १०८० व उच्च शाळा -१७३ असे एकूण ४९५०३ शासकीय शाळांमध्ये ग्रंथालयाकरीता पुस्तके उपलब्ध करण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषदांकडील सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान, शाळा दत्तक योजना या माध्यमांतून शाळा इमारतींचे बांधकाम, पायाभुत सुविधा व देखभाल दूरूस्ती केली जाते. समग्र शिक्षा अंतर्गत दुर्गम भागातील ज्या शाळांना वीज पुरवठा उपलब्ध नाही अशा शाळांमध्ये सौर ऊर्जा संच उपलब्ध करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे शाळांमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(२२) * २९०४ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बहुतांश शाळांमध्ये ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा उपलब्ध नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल करायला मिळत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने नवीन शिक्षण धोरणात (NEP) आवश्यक सुधारणा करण्यात येऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सन २०२४-२५ च्या यु-डायस माहितीनुसार शासकीय माध्यमिक १८८७ शाळांपैकी १३५२ शाळांमध्ये व उच्च माध्यमिकच्या ३६९ पैकी २७७ शाळांमध्ये प्रयोगशाळा आहेत. उर्वरीत शाळांमध्ये सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या कालावधीत केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मंजूर झालेल्या प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, ज्या शाळांना या शैक्षणिक वर्षात प्रयोगशाळा उपलब्ध करून देता येणार नाही, अशा शाळांबाबत समग्र, पीएमश्री व स्टार्स या केंद्र पुरस्कृत योजनांच्या पुढील आर्थिक वर्षातील वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात प्रयोगशाळा मंजूरीचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माध्यमिक शिक्षणाधिकारी, नंदुरबार यांना पदावरून दूर करण्याबाबत

**(२३) * २९१६ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन शिक्षण उपसंचालक, पुणे तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक, नंदुरबार यांना लाच घेतल्या प्रकरणी अटक करून निलंबित करण्यात आले असून माध्यमिक शिक्षणाधिकारी, नंदुरबार यांच्यावर

अधिकची संपत्ती असल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे कय,
(२) असल्यास, माध्यमिक शिक्षणाधिकारी, नंदुरबार यांचेवर लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल होऊनही व विभागीय चौकशी सुरु असतानाही त्यांना शिक्षणाधिकारी माध्यमिक या कार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माध्यमिक शिक्षणाधिकारी, नंदुरबार यांना लाच घेतल्याप्रकरणी शिक्षणाधिकारी माध्यमिक या कार्यकारी पदावरून दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नंदुरबार व त्यांची पत्नी यांच्याविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे दिनांक ०४/०७/२०२४ रोजी अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नंदुरबार यांना लाचलुचपत प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने निलंबित केल्यानंतर त्यांची दिनांक २९/०६/२०२० च्या शासन आदेशान्वये शिक्षणाधिकारी (निरंतर), जि.प.वर्धा या अकार्यकारी पदावर आणि दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन आदेशान्वये शिक्षणाधिकारी (निरंतर), जि.प.ठाणे या अकार्यकारी पदावर पदस्थापना करण्यात आली होती. तद्नंतर शासन आदेश दिनांक ३०/०५/२०२३ अन्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नंदुरबार या पदावर पदस्थापना करण्यात आली आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नंदुरबार यांच्याविरुध्दचे लाचलुचपत प्रकरण हे ते तत्का. प्रभारी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे या पदावर कार्यरत असतानाचे आहे. त्यानुषंगाने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नायगाव येथील कोकण विकास को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(२४) * ४२४३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नायगाव येथील कोकण विकास को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोसायटीच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करुन बनावट तसेच काल्पनिक नावांचा वापर करुन कोटयवधी रुपयांचे कर्ज मंजूर करुन घेतले असून सदर गैरव्यवहाराबाबत भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील नायगाव येथील कोकण विकास को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये केलेल्या कोटयवधी रुपयांच्या

गैरव्यवहाराबाबत संबंधित दोषी पदाधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.

सन २०२३-२४ या कालावधीतील वैधानिक लेखापरिक्षण अहवालावरुन बनावट तसेच काल्पनिक नावाचा वापर करुन रुपये १,७४,५२,९००/- इतके कर्ज मंजूर केल्याचे दिसून येते. त्यानुषंगाने संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी भोईवाडा पोलीस स्टेशन मुंबई येथे दिनांक १२/०४/२०२५ रोजी संस्थेच्या ०४ पदाधिकारी यांचेसह एकूण ८ व्यक्तींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.
(३) सन २०२३-२४ या कालावधीतील प्रशासकीय विशेष अहवालावरुन संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याकरीता सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १२/०६/२०२५ रोजी कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरी भागांमध्ये भूस्खलनाचा धोका वाढल्याबाबत

**(२५) * २५२६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरी भागामध्ये, विशेषतः पश्चिम घाटाच्या पायथ्याशी असलेल्या प्रदेशात, भूस्खलनाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला असून अतिवृष्टी, डोंगर उतारावरील वृक्षतोड, अनियंत्रित बांधकाम आणि भूगर्भीय बदलांमुळे हा धोका वाढला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरी भागामध्ये पावसाळयामध्ये तेथील ८८ ठिकाणी भूस्खलनाचा इशारा देण्यात आला असून काही अत्यंत धोकादायक ठिकाणांवरील वस्त्यांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत तसेच जिल्हा प्रशासनाकडून भूस्खलन प्रतिबंधक उपाययोजनांसाठी शासनाकडे निधीची मागणी केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मान्सून पूर्व कामात भूस्खलन प्रवण क्षेत्रांचा भूवैज्ञानिक अभ्यास करून, तज्ञांच्या शिफारशीनुसार कायमस्वरूपी उपाययोजना (उदा. संरक्षक भिंती, उताराचे स्थिरीकरण, वृक्षारोपण, ड्रेनेज सिस्टिम सुधारणे) आखल्या जातात, परंतु त्याबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरी भूस्खलनाचा धोका टाळण्यासाठी व्यापक व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) सदर बाब सन २०२३ च्या अतिवृष्टीमध्ये निदर्शनास आली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार जिल्ह्यामध्ये ३९ दरड / भूस्खलन प्रतिबंधात्मक कामासाठी रुपये ३१.६३ कोटी इतका निधी मंजूर केला आहे.

तसेच महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दरड / भूस्खलन प्रतिबंधात्मक कामांसाठी रुपये २३० कोटी इतका निधीची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय भूस्खलन व दरडग्रस्त भागातील नागरीकांचे वेळोवेळी तात्पूरते स्थलांतर करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत त्रिभाषा सुत्राच्या अंमलबजावणीबाबत

**(२६) * ३२३० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय खोडके, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची अंमलबजावणी राज्याच्या शालेय शिक्षण विभागामार्फत येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्याचे नियोजन असून त्रिभाषासुत्र इयत्ता ३ री पासून राबविण्यात येत असून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NCF) नुसार तृतीय भाषा इयत्ता सहावी पासून शिकविण्यात यावी अशी तरतूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिलल्या आदेशानुसार व राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांना तीन भाषा इयत्ता १ ली पासून शिकविण्याचे बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२५-२६ या नव्या शैक्षणिक वर्षापासून नवे शैक्षणिक धोरण लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून या धोरणानुसार पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य असणार आहे, तसेच शिक्षण धोरण सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून चार टप्प्यात विविध वर्गांना लागू होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इयत्ता पहिलीपासूनच हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या होत असलेल्या विरोधाबाबत शासनाने आपल्या धोरणाचा पुनर्विचार करून राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याप्रमाणे अथवा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे भाषा योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० महाराष्ट्र शासनामार्फत स्वीकारण्यात आलेले आहे. त्रिभाषा सूत्र राज्यात सन २०२५-२६ पासून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तिसरी भाषा इयत्ता १ ली व २ री साठी श्रवण व भाषण स्वरुपात असावी अशी शिफारस करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - पायाभूत स्तर आणि शालेय शिक्षण (NCF-FS & NCF-SE) नुसार कोणत्या इयत्तेपासून हे सूत्र राबवावे याचे स्वातंत्र्य राज्यांना देण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

नवीन अभ्यासक्रम सन २०२५-२६ पासून चार टप्प्यात विविध वर्गांना लागू होणार आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २९ जून, २०२५ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये, दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजीचा शासन निर्णय व दिनांक १७ जून, २०२५ रोजीचे शासन शुध्दिपत्रक रद्द करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. तसेच, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्राबाबतचे धोरण निश्चिती करण्याकरीता, शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येणार असून, सदर समितीच्या अहवालाच्या आधारे पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाळेच्या खाजगी बसमधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा मार्गदर्शक नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२७) * २७६९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील एका नामांकित शाळेच्या व्हॅन चालकाने चार अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील कृत्य करुन सदर प्रकार घरी सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शाळेच्या खाजगी बसमध्ये महिला अटेंडंट (परिचरिका) बंधनकारक असतानाही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नसल्यामुळे असे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक बसमध्ये पॅनिक बटन, आग प्रतिबंधक स्प्रिंकलर, जीपीएस (GPS) आणि सीसीटीव्ही (CCTV) बसविणे ही नियमावली शासनाने जाहीर केली आहे, परंतु, या सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होते किंवा नाही, याची शासनातर्फे तपासणी करण्यात येणार आहे तसेच याप्रकरणी अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी शाळांची जबाबदारी निश्चित करून यात पालकांचा ही सहभाग करून घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ज्या शाळांकडून खाजगी बस मुलांसाठी उपलब्ध करून देण्यात येतात अशा शाळा सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करत नसल्यास या शाळांवर शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात येणार आहे, तसेच अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) या प्रकरणी संबंधित खाजगी वाहनामध्ये महिला परिचरेची नियुक्ती झालेली नव्हती, असे निदर्शनास आले आहे.

(३) नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती व विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समित्या कार्यान्वित असुन विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, पालक व नामांकित व्यक्तींचादेखील समावेश आहे.
(४) व (५) खाजगी बसद्वारे होणा-या विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

या प्रकरणी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीस यंत्रणेद्वारे तसेच विभागाद्वारे देखील या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव येथे अनधिकृतपणे शेतकऱ्यांकडून आडत कपात करण्यात येत असल्याबाबत

**(२८) * २८२७ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आडत बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव (ता.निफाड) येथे श्री.वाल्मीक काशिनाथ सांगळे या शेतकऱ्याने कांदा विक्री केल्यानंतर त्याची अनधिकृतपणे आडत कपात करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक बाजार समितीमध्ये आडत बंद असूनही अनधिकृतपणे शेतकऱ्यांकडून आडत कपात करण्यात येत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांची कपात करण्यात आलेली रक्कम त्यांना परत करावी, याबाबत मा.मंत्री, पणन यांना पत्रव्यवहार करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाजार समितीमध्ये आडत बंद असूनही अनधिकृतपणे शेतकऱ्यांकडून आडत कापात करण्याऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांची आडत म्हणून कापलेली रक्कम त्यांना परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

शेतकरी श्री.वाल्मीक काशिनाथ सांगळे ता.येवला जि.नाशिक यांनी लासलगाव मुख्य बाजार आवारात दिनांक १४/०४/२०२५ ते दिनांक ३०/०५/२०२५ या कालावधी दरम्यान एकूण १४९.४५ क्विंटल माल विक्री केला आहे. श्री.सांगळे यांच्याकडून एकूण मालविक्री रकमेतून प्रति क्विं. रुपये ४.३२ तोलाई, रुपये ५.४६ हमाली व रुपये ०.८७ पैसे वाराई या दरानुसार कपात करून हिशोबपट्टीवर हस्तलिखीत स्वरुपात नमूद करण्यात आली आहे. कपात केलेली रक्कम ही शासकीय दरानुसार हमाली, तोलाई व वाराईसाठी करण्यात आलेली असल्याने ती आडत म्हणून गणली जाऊ शकत नाही, त्यामुळे श्री.सांगळे यांच्याकडून कोणतीही आडत वसूल करण्यात आलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

शासन पत्र दिनांक १९/०५/२०२५ अन्वये मा.श्री.सदाभाऊ खोत, वि.प.स. यांचे पत्र पणन संचालक पुणे व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम, १९६७ मधील तरतूदीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

(३) विभागाच्या दिनांक ०५/०७/२०१६ रोजीच्या शासन राजपत्रातील अध्यादेश क्र.१५ अन्वये बाजार समित्यांमध्ये आडत वसुली प्रथेत सुधारणा करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०६/०७/२०१६ रोजी नाशिक जिल्ह्यातील सर्व बाजार समितीच्या आवारामध्ये शेतकरी बांधवांकडून आडत वसुली पूर्णत: बंद करण्याबाबतचे निर्देश दिले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मराठी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे कमी झाल्याबाबत

**(२९) * २८८२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी माध्यमांच्या शाळांमधील पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याने मराठी माध्यमांच्या एकूण २२ हजार शाळा असून त्याकरीता २.९२ लाख पदे मंजूर करण्यात आली असून प्रत्यक्षात कार्यरत पदे फक्त २.२० लाख असून मागील १५ वर्षात ७२ हजार पदे कमी झाली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शाळांकडे विद्यार्थ्यांचा कमी झालेला कल, ग्रामीण भागातील नागरिकांचे रोजगारासाठी शहराकडे झालेले स्थलांतरण यामुळे विद्यार्थी संख्या घटली असून त्यामुळे शिक्षकांची पदे कमी झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर पदे कमी असण्याची कारणे काय आहेत, तसेच मराठी शाळांमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सोयीसुविधा देऊन घटलेली पटसंख्या वाढविण्यासाठी व सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२४-२५ मध्ये शिक्षणाधिकारी लॉगीनला उपलब्ध करून देण्यात आलेल्या संचमान्यतेनुसार राज्यामध्ये सर्व व्यवस्थापनाच्या १७,२६३ शाळा असून त्यामध्ये आधार प्रमाणित विद्यार्थीसंख्येच्या आधारावर एकूण १,९२,५८४ शिक्षक पदे मंजूर झाली आहेत. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी वाढत असल्याने शहरी भागात स्थलांतर होत असल्याने ग्रामीण भागात विद्यार्थी संख्येत काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.

(३) शाळांमधील गळती कमी करण्यासाठी सातारा आणि सांगली येथील ५४० शाळांचे मॉडेल शाळांमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये विद्यार्थी वाढ होण्याच्या दृष्टीने ४७७ "आदर्श शाळा" व ८२७ "पीएमश्री शाळा" निर्माण करण्यात आल्या आहेत. सदर शाळांमधून अनुक्रमे १,३१,८९५ व २,९९,३९९ विद्यार्थी शिक्षण घेत असून अनुक्रमे ४३४९ व ८३३१ शिक्षक कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील कृषीमाल ठेवण्याकरीता आरक्षित असलेल्या जागेवर अनधिकृतपणे मंगल कार्यालय उभारल्याबाबत

**(३०) * ४०२० श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील आर्वी नगरपरिषद हद्दीअंतर्गत मालमत्ता क्रमांक ८५४९, ९३९७, ८५४८, ८५५० या चारही जागा ह्या आर्वी तहसिल सहकारी खरेदी-विक्री संस्था, आर्वी यांच्या मालकीच्या असून त्या शेतकऱ्यांचा कृषीमाल ठेवण्याकरीता आरक्षित असतानाही त्या जागेवर अनधिकृतपणे मंगल कार्यालय उभारून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्वी तहसिल सहकारी खरेदी-विक्री संस्था, आर्वी यांच्या मालकीच्या व शेतकऱ्यांचा कृषीमाल ठेवण्याकरीता आरक्षित असलेल्या जमीनीवर अनधिकृतपणे मंगल कार्यालय उभारून व नियमबाह्यरित्या मंगल कार्यालयाचा व्यवसाय करून त्यापासून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाचा लेखाजोखा न ठेवता सदरचे उत्पन्न वैयक्तिकपणे वापरून आर्थिक अपहार करणाऱ्या संबंधित दोषींची चौकशी करून कारवाई करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.पणनमंत्री व पणन सचिव यांना दिनांक २७ मे, २०२५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनानुसार अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

आर्वी (जि.वर्धा) येथील आर्वी नगरपरिषद हद्दीअंतर्गत मालमत्ता क्रमांक ८५४९, ८५४८, ८५५० या तीन जागा ह्या आर्वी तहसिल सहकारी खरेदी-विक्री संस्था, आर्वी यांच्या मालकीच्या असून ९३९७ ही जागा संस्थेच्या मालकीची नाही. सदर संस्थेच्या जागा शेतकऱ्यांचा कृषीमाल ठेवण्याकरीता आरक्षित करण्यात आलेल्या नाहीत. संस्थेच्या जागेवर मंगलकार्यालय भाड्याने चालविण्यासाठी संस्थेने वेळोवेळी आमसभेत ठराव मंजूर करुन घेतला असून संस्थेला भाड्यापोटी नियमितपणे रक्कम प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशीकरून अहवाल सादर करण्याबाबत पणन संचालक यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ सिंचन योजनेतील पाणी वितरणासाठी संस्था स्थापन करण्याबाबत

**(३१) * २९७२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ योजनेतून सिंचनासाठी उपसा सुरू होऊन वीस वर्षे होऊनही पाणी वितरणासाठी पाणी संस्था सक्रिय नसल्याने पाण्याचा उपसा वाटप आणि वसुली ही सर्व प्रक्रिया अद्याप कृष्णा खोरे महामंडळाकडून केली जात असल्याने म्हैसाळ योजनेची थकबाकी २६ कोटी रुपयांवर पोहोचली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचन योजनांच्या नियमावलीतच पाण्याचे वाटप पाणी संस्थामार्फत व्हावे अशी तरतूद असतानाही कृष्णा खोरे महामंडळाने काही ठिकाणी संस्था स्थापन केल्या असून त्या कागदावरच असल्याने प्रत्यक्ष कामे महामंडळालाच करावी लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावनिहाय पाणी संस्था सक्रिय झाल्यास थकबाकीचा प्रश्न प्रलंबित राहणार नाही अशी अपेक्षा लाभार्थी शेतकरी व संस्थेकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे, काय,
(४) असल्यास, सिंचनासाठी वीज बिलात सवलत देताना ८१ टक्के बिलाची जबाबदारी महामंडळाने स्वतःवर उचलून उर्वरित १९% बिले शेतकऱ्यांनी भरावयाची आहेत त्यालाही शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, म्हैसाळ योजनेतील पाण्याचे सिंचन योजनेच्या नियमावलीनुसार पाणी संस्था स्थापन करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ योजनेचे काम सन १९९६ पासून सुरु झाले. परंतु प्रकल्पाच्या बांधकामाची कामे निधी उपलब्धतेनुसार प्रगतीत आहेत. सद्य:स्थितीत सर्व कालव्यांवर लाभक्षेत्र विकास कामे प्रगतीपथावर आहेत. कवठे महांकाळ व जत भागासाठी एकूण १७० पाणी वापर संस्था स्थापन करणेची कामे प्रगतीत आहेत. त्यामुळे क्षेत्रिय परिस्थितीचा विचार करीता पाणी वाटप व वसुली जलसंपदा विभागामार्फत केले जात आहे. तसेच लाभधारकांमध्ये पाणी पट्टी जमा करणेबाबत उदासीनता जाणवते. उर्वरीत कामे पूर्ण करून क्षेत्र पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत.
(२) सदरचा प्रकल्प हा बांधकामाधीन प्रकल्प असलेने व लाभक्षेत्र विकास कामे प्रगतीपथावर आहे. म्हैसाळ योजनेच्या कवठेमहांकाळ भागातील लाभक्षेत्रात ९६ पाणी वापर संस्था स्थापन करणेचे काम

प्रगतीपथावर आहे. त्यापैकी २५ पाणी वापर संस्थांचे संचालक मंडळ स्थापन करण्यात आलेले आहेत.

म्हैसाळ योजनेच्या जत भागातील लाभक्षेत्रात ७५ पाणी वापर संस्था स्थापन काम प्रगतीपथावर आहे. त्यापैकी २२ पाणी वापर संस्थांचे संचालक मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. उर्वरीत संस्थाचे संचालक मंडळ स्थापन करणेचे काम प्रगतीत आहे. पाणी वापर संस्थाना क्षेत्र हस्तांतरण झाले नसलेने पाणी वितरण महामंडळामार्फत करणेत येत आहे.

(३) गावनिहाय पाणी वापर संस्था सक्रीय करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) होय.

शासन निर्णय क्र संकीर्ण - २०१४ (४३/१४) सिं. व्य (धो), दिनांक २७/०२/२०१८ अन्वये पाणीपट्टी आकारणी हि १९% नुसार करणेत येते. त्यामुळे वीज व पाणीपट्टी बिलाचा ८१% भार महामंडळ उचलते. उर्वरित १९% बिले शेतकऱ्यांनी भरावयाची असून त्यालाही अंशत: प्रतिसाद मिळतो.

(५) शासनाचे धोरणानुसार पाण्याचे वाटप व नियोजन शेतकऱ्यांच्या सहभागातून करणेसाठी पाणी वापर संस्था स्थापन करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील अंजुमन-ए-इस्लाम या संस्थेच्या शाळेच्या गच्चीवर बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांच्या अनधिकृत बांधकामाबाबत

**(३२)** * **३१७५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील अंजुमन-ए-इस्लाम या संस्थेद्वारे गेली काही वर्षे शाळेच्या गच्चीवर इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचे काही वर्ग भरविले जात असून सदरहू गच्चीवर जाण्यासाठी विद्यार्थ्यांना दप्तरासह सात मजले चढून जावे लागत असल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून गच्चीवर तयार केलेल्या वर्गखोल्या या अनधिकृत बांधकाम असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्य बाल हक्क आयोगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शिक्षण निरीक्षक, दक्षिण आणि शाळा प्रशासनाला दिलेले असतानाही अद्याप शिक्षण निरीक्षक दक्षिण यांनी व शाळा प्रशासनाने राज्य बाल हक्क आयोगाकडे सदरहू अहवाल व वैध कागदपत्रे अद्यापही सादर केलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील अंजुमन-ए-इस्लाम या संस्थेद्वारे शाळेच्या गच्चीवर बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करून शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक १७ मे २०२४ रोजी अहवाल राज्य बाल हक्क आयोग यांना अहवाल सादर केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त जागांवर सेवानिवृत्त शिक्षकांची नेमणूक केल्याबाबत

**(३३) * ३०२६ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित-विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची १२ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याने शासनाने पर्याय म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांना मानधनावर घेऊन पुन्हा सेवेची संधी देण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यात नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत २६२ सेवानिवृत्त शिक्षकांना कंत्राटी तत्त्वावर तात्पुरते शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली असून त्यात मराठी माध्यमाच्या १८८, कन्नड माध्यमाच्या ७१ तर उर्दू माध्यमाच्या ३ अशा शिक्षकांना नेमणूक देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेरोजगार पदवीधरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने शासनाच्या सेवानिवृत्त शिक्षकांच्या नेमणुकीविषयीच्या नवीन धोरणामुळे पदवीधरांमध्ये असंतोषाचे वातावरण, तसेच रोजगाराची संधी हिरावून घेतली जात असल्याची भावना निर्माण झाली असून या कंत्राटी शिक्षकांच्या भरतीला विविध शिक्षक संघटनांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत बेरोजगार तरुणांना नोकरी मिळण्याच्या अनुषंगाने शिक्षकांच्या भरती प्रक्रियेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) पवित्र पोर्टलमार्फत नियमित शिक्षक उपलब्ध हाईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या कारणास्तव जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकीय पदे सेवानिवृत्त शिक्षकांमधून भरणेबाबतचा निर्णय जुलै, २०२३ मध्ये घेण्यात आलेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक प्राप्त होईपर्यंत मराठी माध्यम २६९, कन्नड माध्यम ८९ व उर्दू माध्यम ०३ असे एकूण ३६१ कंत्राटी शिक्षक सेवानिवृत्ती शिक्षकांमधून नेमण्यात आलेले आहेत.

(३) सेवानिवृत्त शिक्षकांची नेमणूक करणे ही तात्पुरती व्यवस्था असून अशा पदांवर पवित्र पोर्टलमार्फत नियमित नियुक्ती होत असल्याने या निर्णयास विरोध असण्याचे कारण दिसून येत नाही.

(४) राज्यात शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ अनुसार झालेल्या शिक्षक भरतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये एकूण १८०३४ शिक्षकांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच टप्पा-२ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदभरती या प्रकारात १११४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे व मुलाखतीसह या प्रकारातील उमेदवारांची शिफारस करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कोहिनूर कनिष्ठ महाविद्यालयात बोगस एम.फिल. पदवीप्रमाणपत्राच्या आधारे पीएचडीला प्रवेश घेतल्याबाबत

**(३४) * ३४८७ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील कोहिनूर कनिष्ठ महाविद्यालयात एम.फिल.चे बोगस पदवी प्रमाणपत्र दाखल करून दोघांनी पीएचडीला प्रवेश घेतल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुलताबाद येथील कोहिनूर कनिष्ठ महाविद्यालयातील शेख मोहम्मद हफिज उर रहमान नावाच्या उमेदवाराने संस्थाचालक व इतरांना हाताशी धरुन बोगस पदवी प्रमाणपत्र दाखल करून लाभ मिळविल्याच्या तक्रारी सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर विभागात बोगस पदवी तयार करणारे रॅकेट असण्याची शक्यता असल्याने एसआयटीच्या माध्यमातून चौकशी करण्याची तसेच खुलताबाद येथील कोहिनूर महाविद्यालयातील गुन्हे दाखल करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना बडतर्फ करण्याची व या संस्थेची मान्यता रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागात बोगस पदवी तयार करणारे संबंधित दोषींवर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खुलताबाद येथील कोहिनूर कनिष्ठ महाविद्यालयातील शेख मोहम्मद हफिज उर रहमान या उमेदवाराच्या पदवी, पदव्युत्तर पदवी व बी.एड. प्रमाणपत्राबाबत शालेय शिक्षण विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) या विषयीचे लोकप्रतिनिधींचे दिनांक ०८ मे, २०२५ रोजीचे पत्र शासनाकडे प्राप्त झाले आहे.

(४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठामध्ये दोन उमेदवारांनी एम. फिल.च्या पदव्यांच्या आधारे पीएच.डी. साठी प्रवेश घेतला होता.विद्यापीठाकडून या उमेदवारांच्या एम.फिल. पदव्यांची तपासणी केली असता त्या बोगस असल्याचे निदर्शनास आल्याने त्या दोन्ही विद्यार्थ्यांचे पीएच.डी. प्रवेश रद्द करण्यात आले आहेत. त्या दोन्ही विद्यार्थ्यांविरुध्द बेगमपुरा पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, खुलताबाद येथील मोहम्मद हफिज उर रहमान मोहम्मद मोईजुद्दीन या सहशिक्षकाची पदवी व पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक बनावट असल्यामुळे संबंधिताची

वैयक्तिक मान्यता विभागीय अध्यक्ष, विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी रद्द केली आहे. त्यांना कुठलेही शासकीय वेतन अनुदान देण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील शाळांच्या आवारात नवीन इमारती बांधल्याने शाळांची मैदाने कालबाह्य होत असल्याबाबत

**(३५) * २३३५ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषद विभागाच्या दुर्लक्षपणामुळे शाळेच्या आवारात नवीन इमारती बांधण्यात येत असल्याने जिल्ह्यातील शाळांची मैदाने आता कालबाह्य होत असल्याची बाब माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील ३०० शाळा या मैदानाविनाच आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या शाळांच्या आवारात खेळाचे मैदान नाही अशा शाळांवर कारवाई करण्याबाबत तसेच जिल्ह्यातील प्रत्येक शाळेमध्ये खेळाचे मैदान असावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २९/०६/२०१३ च्या शासन निर्णयान्वये ज्या शाळांना स्वत:चे क्रीडांगण नसल्यास शाळेच्या परिसरामध्ये शाळा व्यवस्थापन समितीने बालकांना खेळण्यासाठी ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पालिका, महानगरपालिका व खाजगी मालकीच्या जागा इ. ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन तात्पुरत्या स्वरूपात क्रिडांगण उपलब्ध करून देण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील सर्व शाळांना क्रिडांगण उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामध्ये वितरित करण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्रांमध्ये चुका झाल्याबाबत

**(३६) * २६७१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाने माहे मार्च, २०२५ मध्ये झालेल्या पदवीदान समारंभात वितरित केलेल्या पदवी प्रमाणपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात व्याकरणीय चुका झाल्या असून वितरित केलेल्या इंग्रजी भाषेतील पदवी प्रमाणपत्रात मुंबई विद्यापीठाच्या नावात मुमाबाई अशा प्रकारे स्पेलिंग मुद्रित झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाने प्रमाणपत्र मुद्रीत करणाऱ्या आंध्र प्रदेशातील हायटेक प्रिंट सिस्टीम लिमिटेड या कंत्राटदाराची फक्त चौकशी करण्याचे आदेश दिले असून प्रमाणपत्रे बदलून देण्याबाबत कुठल्याही सूचना दिलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे बदलून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच आंध्र प्रदेशातील हायटेक प्रिंट सिस्टीम लिमिटेड चुकीची प्रमाणपत्रे मुद्रीत करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच सदर प्रमाणपत्राचे मुद्रिते न तपासता तपासणी अधिकारी यांनी प्रमाणपत्रे वितरीत करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या दीक्षांत समारंभानंतर पदवी वितरण करण्यासाठी छापलेल्या पदवी प्रमाणपत्रांवर केवळ मुंबई विद्यापीठाच्या बोधचिन्हात मुद्रणदोष असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्र मुद्रीत करणाऱ्या आंध्रप्रदेशातील हायटेक प्रिंट सिस्टम लिमिटेड या छपाई कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्याअनुषंगाने त्यांच्याकडून सदर चूक मान्य असल्याचे व चुकीचे सर्व पदवी प्रमाणपत्र पुनःश्च विनामूल्य मुद्रीत करण्याचे त्यांनी मान्य केले व त्याप्रमाणे मुद्रीत करुन सर्व पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास प्राप्त झालेले आहेत.

(३) दीक्षांत सभारंभानंतर प्रथम १५ दिवसांच्या कालावधीत एकूण महाविद्यालयांपैकी ५% पेक्षा कमी महाविद्यालयांमध्ये पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाने तात्काळ दखल घेऊन ज्या महाविद्यालयांनी पदवी वितरण सोहळे आयोजित केले होते अशा सर्व महाविद्यालयांना प्रमाणपत्र विद्यापीठास परत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. वितरित झालेली पदवी प्रमाणपत्रे परत मागवून त्यांना नव्याने सुधारित प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. महाविद्यालयांच्या दीक्षांत समारंभांमध्ये नव्याने मुद्रित प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. विद्यापीठाद्वारे मुद्रीत केलेल्या पदवी प्रमाणपत्रावरील विद्यापीठाच्या बोधचिन्हामध्ये मुद्रणदोष निदर्शनास आल्यामुळे त्यासंदर्भात विद्यापीठामार्फत त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाला आहे. या अहवालातील शिफारशी विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांपुढे ठेवण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगरुळ (बु), परभणी येथील प्राथमिक शाळेतील शिक्षकाच्या आत्महत्येबाबत

**(३७)** * **४२६२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ (बु)(ता.मानवत, जि.परभणी) येथील श्री नृसिंह प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले सोपान उत्तमराव पालवे रा.आडगाव दराडे, ता.सेलू जि.परभणी यांनी संस्था सचिवाकडून संच मान्यतेकरीता होणाऱ्या पैशाच्या मागणीला व मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या

केल्याची घटना घडली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संच मान्यतेकरीता पैशांची मागणी करुन मानसिक त्रास देणाऱ्या संबंधित दोषी संस्था सचिवांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी कलम १०८ भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अन्वये एफ.आय.आर. दाखल झाल्याने पोलीस तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येत असल्याबाबत

**(३८) * ३२२७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व शिक्षकांना अध्यापन करणे हे विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे काम असताना त्यांना अशैक्षणिक कामे सरकारी यंत्रणांकडून देण्यात येत असून अशैक्षणिक कामे कोणती याची माहिती दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयात स्पष्ट असतानादेखील शिक्षकांना दहावी आणि बारावीचे पेपर तपासणीचे काम असताना अध्यापनाऐवजी निपुण भारत उपक्रम, शालेय कामकाज आणि शालाबाह्य बालकांचे सर्वेक्षण याबरोबरच आता निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षणाचे काम शिक्षकांना देण्यात आल्याने या सर्व अशैक्षणिक कामाचा ताण शिक्षकांवर येत असल्यामुळे शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा घसरत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने निरक्षरांना साक्षर करण्यासाठी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यासाठी शिक्षण संचालकांनी शिक्षकांना दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी आदेश दिले असून या कार्यक्रमाचा ६ कोटींचा निधी दिनांक १७ एप्रिलपर्यंत खर्च करण्याचे आदेश शिक्षण संचालनालयाच्या योजना विभागाने दिनांक ४ एप्रिलला संबंधित जिल्ह्यांना दिले आहेत तसेच निरक्षरांना साक्षर करण्यासह अन्य काही कार्यक्रमांसाठी सन २०२४- २५ या वर्षाकरीता प्रति निरक्षर १५७ रुपये ३६ पैसे यानुसार जिल्ह्यांना ५ कोटी ९९ लाख रुपये देण्यात आले असून साक्षरतेच्या कार्यक्रमात सामील झालेल्या ६,७०,३२९ निरक्षरांसाठी ही रक्कम वितरित करण्यात आली असून शिक्षकांना निरक्षर व्यक्तींची नोंदणी उल्लास मोबाईल ॲपवर करावयाची आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु असताना व दहावी व बारावीचे पेपर तपासणीचे काम शिक्षकांकडे असतानाही निरक्षरांना साक्षर करण्याचे काम शिक्षकांमार्फत करण्यात येत असल्याने परीक्षा हंगामात १३ दिवसांत साक्षरता निधी कसा खर्च करणार व ६७०३२९ निरक्षरांना १३ दिवसात साक्षर

करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची चौकशी करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी व लोकप्रतिनिधी यांनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने निरक्षरांना साक्षर करण्याच्या महत्वाच्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी कार्यक्रम राबवून शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच शिक्षकांना अशैक्षणिक काम न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

प्रौढ शिक्षण हा विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने यांतर्गत केले जाणारे सर्वेक्षण व इतर बाबी हे अशैक्षणिक समजले जात नाही. शासन निर्णयातील परिशिष्ट-१ प्रमाणे उल्लास- नवभारत साक्षरता कार्यक्रम हा शैक्षणिक अभियान आहे.

(२) अंशतः खरे आहे.

प्राप्त झालेला निधी २०२४-२५ या वर्षाकरीता असल्यामुळे सदर निधी खर्च करण्यास कोणतीही अडचण नव्हती. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त रक्कम विहित मुदतीत खर्च करणे अपेक्षीत असते, जेणेकरुन पुढील अनुदान वेळेत राज्यशासनास प्राप्त होते.

(३) अंशत: खरे आहे.

उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत खर्च करावयाचा निधी केंद्राच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ५ बाबींसाठी करण्यात येतो. तसेच निरक्षर व्यक्तींची नोंदणी उल्लास मोबाईल ॲपवर करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघाने (NAFED) कांदा खरेदीसाठी सदस्य सहकारी संस्थांची साठवणुकीच्या क्षमतेची अट शिथिल करण्याबाबत

**(३९)** * **२८३७ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदा खरेदीसाठी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (NAFED) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (NCCF) या दोन केंद्रीय संस्था शासनाची नोडल एजन्सी म्हणून काम पाहणार असून केंद्र शासनाने सन २०२५ करीता किंमत स्थिरीकरण निधी' (PSF) अंतर्गत ०३ लाख मे. टन उन्हाळी कांद्याचा बफर स्टॉक करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कांदा खरेदीसाठी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (NAFED) ने सदस्य सहकारी संस्थांकडून तर राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (NCCF) ने शेतकरी उत्पादक कंपन्या, महासंघ, सहकारी संस्थांकडून निविदा मागविल्या असून सदर कांदा खरेदीत नाशिक जिल्ह्यातून ०१ लाख मे. टन कांदा खरेदी केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थांना ठेवलेली कांदा साठवणुक क्षमतेची अट ही मोठी असल्याने पुरेशा साठवणुक क्षमतेअभावी अनेक संस्था सदर निविदा स्पर्धेतुन बाहेर पडण्याची शक्यता आहे, त्यामुळे पुन्हा एकदा विशिष्ट संस्थांकडेच कांदा खरेदीची मक्तेदारी राहुन ज्या उद्देशांसाठी नाफेडने पारदर्शक निविदा प्रक्रिया राबविण्याचे ठरविले होते तो उद्देश सफल होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर संस्थांसाठी ठेवण्यात आलेली कांदा साठवणुक क्षमतेची अट शिथील करून जास्तीत जास्त पात्र व अनुभवी संस्थांना सदर कांदा खरेदीत समाविष्ट करून घेणेकामी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (NAFED) ला आदेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) केंद्रीय ग्राहक संरक्षण विभागाने निश्चित केलेल्या खरेदी मानक पध्दती (SoP) नुसार नाफेड व एनसीसीएफ या संस्थांमार्फत खरेदी प्रकीया राबविण्यात येते. त्यानुसार कांदा खरेदीसाठी नाशिक जिल्ह्यासाठी सिंगल प्रिमायसेस साठवणुक क्षमता ५००० मे.टन व इतर जिल्हयांसाठी २००० मे.टन क्षमता निश्चित केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रंथालयांच्या प्रलंबित अर्जांना मान्यता देण्याबाबत

**(४०) * ३००२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ११ हजारांहून अधिक मान्यताप्राप्त ग्रंथालये असून २ हजार ग्रंथालये अद्याप मान्यतेच्या प्रतिक्षेत असल्याचे तसेच चार हजारांहून अधिक ग्रंथालयांना वाढीव अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ पासून दोन हजार ग्रंथालयांनी मान्यतेसाठी शासनाकडे अर्ज केले, परंतु मान्यता न मिळाल्यामुळे ती अनुदानापासून वंचित असून २१ हजारांहून अधिक कर्मचारी शासनमान्य ग्रंथालयात काम करीत असूनही शासनाने अनुदान दिल्याशिवाय या कर्मचाऱ्यांचे वेतन देता येणे शक्य नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालय परिषद आणि जिल्हा ग्रंथालय समित्यादेखील स्थापन झाल्या नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने ग्रंथालयांना मान्यता देणे, वाढीव अनुदान देणे तसेच ग्रंथालय परिषद व जिल्हा ग्रंथालय समित्या स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यात माहे मार्च २०२५ अखेर ११,१५५ इतकी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या

ग्रंथालयामध्ये सुमारे २०,३३५ इतके कर्मचारी कार्यरत आहेत. सदर ग्रंथालयांना महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० नुसार परिरक्षण अनुदान देण्यात येते. या अनुदानातून ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ५० टक्के व वेतनेतर बाबींवर ५० टक्के इतका खर्च करणे बंधनकारक आहे.

सन २०१२-१३ पासून उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक ०७/०६/२०१४ अन्वये सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याची कार्यवाही बंद आहे.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दिनांक २१/१२/२०२२ नुसार राज्यातील सर्व पात्र शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ६०% वाढ करण्यात आली असून त्यानुसार अनुदान पात्र शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना दरवर्षी अनुदान देण्यात येते.

(३) व (४) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ मध्ये दिनांक ०१/०१/२०२५ रोजी सुधारणा करण्यात आली असून महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) अधिनियम, २०२४ प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्य ग्रंथालय परिषद व जिल्हा ग्रंथालय समितीच्या रचनेत सुधारणा करण्यात आली आहे.

त्यानुसार, राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. तसेच, जिल्हा ग्रंथालय समिती गठीत करण्याच्या अनुषंगाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

शासनमान्यता रद्द करण्यात आलेल्या ग्रंथालयांऐवजी अन्य व्यवस्थापनाच्या ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याचा तसेच राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ४० % वाढ करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आडाण (ता.मंगळूरपीर, जि.वाशिम) नदीपात्रातील तीन प्रकल्पांसाठीची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(४१) * २९७९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडाण (ता.मंगळूरपीर, जि.वाशिम) या नदीपात्रात बोरवा बॅरेज घोटा, शिवनी बॅरेज आणि सत्तर सावंगा बॅरेज (संग्रह) या तीन प्रकल्पांसाठी जलसंपदा विभागाने एकूण ५६९ कोटी ६५ लाख रुपयांच्या खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता दिली असून या प्रकल्पाचे काम सुरू झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार जमिनीचे मूल्यांकन करणे, योग्य मोबदला निश्चित करणे व तो वितरित करणे आवश्यक असतानाही सदर प्रकल्पातंर्गत भूसंपादन प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याने शेतकऱ्यांनी आधी जमीन मोजा आणि नंतरच काम सुरू करा अशी मागणी करीत आक्रमक पवित्र घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांसाठी योग्य पुनर्वसन आणि पुनर्वसाहत पॅकेज तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) सद्य:स्थितीत बॅरेजचे नदीपात्रातील काम सुरु झालेले आहे. त्याकरीता भुसंपादनाची आवश्यकता नाही. तसेच प्रकल्पाकरीता आवश्यक खाजगी जमिनीची भूसंपादन प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. धरण बैठकीची मोजणी प्रक्रिया पूर्ण झालेली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रकल्पांकरीता आवश्यक खाजगी जमिनीची मोजणी प्रक्रिया सुरु असून धरण बैठकीची मोजणी पूर्ण झालेली असून बुडीत क्षेत्राची मोजणी प्रगतीपथावर आहे. एकूण ३१ भूसंपादन प्रकरणांद्वारे भूसंपादन प्रक्रिया जिल्हाधिकारी, वाशिम यांचेमार्फत प्रगतीत आहे. तसेच या प्रकल्पांमुळे कोणतेही गावठाण बाधित होत नसल्याने पूनर्वसनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई व उपनगरातील सहकार विभागाच्या निबंधक कार्यालयांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४२) * ३४८९ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व मुंबई उपनगरातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच-पूर्व विभाग, उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) पश्चिम उपनगरे ही व अन्य ४ निबंधकांची कार्यालये त्यांच्या कार्यक्षेत्रात नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या बैठकीत महानगरपालिकेने प्रत्येक वॉर्डमध्ये सहकार विभागाच्या कार्यालयांकरीता जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना मुख्य सचिवांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिका आयुक्तांनी कार्यवाही करण्याच्या सूचना सहाय्यक आयुक्तांना दिनांक ६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिल्या असतानाही सुमारे दोन वर्षांचा काळ उलटूनही अद्यापपर्यंत महानगरपालिकेकडून ८ पैकी एकाही कार्यालयासाठी जागा देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महानगरपालिका आयुक्तांनी कार्यवाही करण्याच्या सूचना सहाय्यक आयुक्तांना दिल्या असतानाही सुमारे दोन वर्षांचा काळ उलटूनही अद्यापही एकाही कार्यालयासाठी जागा न देण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत महानगरपालिकेकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही.

(५) नगरविकास विभागाने जागा उपलब्ध नसल्यामुळे सहायक/उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देता आली नसल्याचे कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ संलग्न विधी महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ मान्यता प्राप्त प्राचार्य व प्राध्यापक नियुक्त केले नसल्याबाबत

**(४३) * ४३४७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या ७४ महाविद्यालयांपैकी ४० विधी महाविद्यालयांत पूर्णवेळ मान्यता प्राप्त प्राचार्य आणि प्राध्यापकांची भरती न केल्यामुळे या विधी महाविद्यालयांना १ लाख रुपये दंड भरण्याबाबत नोटीसा बजाविल्या असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश संख्या शुन्य करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत घेण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार विधी महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य व प्राध्यापकांची भरती करणे आवश्यक असून सदर महाविद्यालयांनी कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपातील प्राध्यापकांव्दारे कामकाज केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश संख्या शुन्य करण्याच्या निर्णयानुसार तीन आणि पाच वर्षीय अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विधी महाविद्यालयांनी मान्यता प्राप्त प्राचार्य आणि प्राध्यापकांची भरती न करणाऱ्या संबंधित संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

संचालक उच्च शिक्षण यांनी दिनांक ०२/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार प्रस्तुत विधि महाविद्यालयांकडून ६ महिने एवढया कालावधीमध्ये सर्व त्रुटींची पूर्तता करण्यात येईल असे हमीपत्र घेण्यात आले असून त्रुटीपूर्ततेच्या अधिन राहून तसेच विद्यार्थ्यांचे हित विचारात घेऊन या महाविद्यालयांचे स्थगित केलेले प्रवेश सन २०२५-२६ पासून पूनश्च: सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(४) सदर विधि महाविद्यालयांना रुपये १ लक्ष एवढा दंड आकारण्यात आला असून या महाविद्यालयांनी ६ महिने एवढया कालावधीमध्ये सर्व त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.